दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २२५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१५ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## थंडीचा कडाका आणखी वाढणार, पुणे राज्यात सर्वात थंड, कोकणात हलक्या पावसाची शक्यता

**दै.रायगड नगरी । मुंबई**

उत्तरेकडील राज्यात किमान तापमानात सातत्याने घट होत असून, तेथील थंड वारे दक्षिणेच्या दिशेने सरकू लागल्याने, राज्यातील तापमानात झपाट्याने घट होत आहे. राज्यात सर्वात कमी किमान तापमान पुणे येथे १३.३ अंश सेल्सिअस नोंदविले गेले आहे. त्याच वेळी कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि कोल्हापूर जिल्ह्यात सोमवारी हलक्या पावसाची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

बहुतांश शहरांचे किमान तापमान घसरत आहे. गेल्या २४ तासांत राज्यात अनेक शहरांचे किमान तापमान १७ अंशांखाली आले असून, यात २६ शहरांचा समावेश आहे.

# १ वर्षात अलिबाग तहसीलदारांकडे मोठे घबाड तर पनवेल प्रांताकडे किती?

## लाचलुचपत खात्याकडून खातेनिहाय चौकशीची नागरिकांची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्यात सर्वाधिक महसूली आणि जमिनीचे व्यवहार चाललेला आणि जमिनीचे भाव गगनाला भिडलेला तालुका म्हणून पनवेल तालुक्याची ख्याती आहे. पनवेलच्या उच्च अधिकारी (क्रिम पोस्ट) पदी नियुक्ती व्हावी म्हणून अनेक अधिकारी मोठ्या प्रमाणात चढाओढ करून पनवेलची खुर्ची बळकाविण्यात अग्रेसर असतात. रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुका हा आर्थिक दृष्ट्या पनवेलपेक्षा कमी महसूली असून देखील तहसीलदार मिनल दळवी यांना लाचलुचपत खात्याने २ लाख रुपयाची लाच घेताना रंगेहाथ पकडले व त्यांच्या घरामध्ये १ कोटीहून जास्त रक्कम रोकड स्वरुपात आणि ६० तोळे सोनेही लाचलुचपत खात्याने ताब्यात घेतले. अलिबाग तालुक्यातील तहसीलदार जर एक वर्षात एवढी माया जमा करीत असेल तर पनवेल-उरण सारख्या दोन महसूली व आर्थिक दृष्ट्या सधन असलेल्या तालुक्यातील प्रांतांकडे लाचलुचपत खात्याची कारवाई केल्यास किती घबाड सापडेल असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांच्या मनात या निमित्ताने येत आहे.

अलिबाग तहसीलदार यांच्यावर नवी मुंबई लाचलुचपत खात्याने कारवाई करून बक्षिसपत्र जमिनीच्या संदर्भात निकाल देण्यासाठी दोन लाख रुपयाची लाच मागितली आणि ती घेत असताना त्यांना ताब्यात घेतले. तर पनवेल आणि उरण तालुक्यातील जमिनीचे भाव गगनाला भिडलेले असलेल्या तालुक्यात लाचलुचपत खात्याने कारवाई करून पनवेल प्रांतांची सखोल चौकशी केल्यास त्यांच्या हाती या ही पेक्षा मोठे घबाड हाती लागेल आणि म्हणूनच पनवेल-उरण प्रांतांनी दै.रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार यांनी मागितलेल्या माहितीच्या अधिकाराखालील माहिती देता येत नाही असे पत्र देवून बगल देण्याचा प्रयत्न केला.

परंतु पनवेल प्रांत कार्यालयातील अनेक प्रकरणे ही संशयास्पद असल्यानेच त्यांनी ही माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याचे समजते. म्हणून ज्या शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे किंवा त्यांच्या विरोधात चुकीचे निर्णय देवून धनदांडग्यांना अभय दिले आहे अशा गरीब शेतकऱ्यांनी पनवेल प्रांतांची लक्तरे उघडी करण्यासाठी पनवेल प्रांतांच्या विरोधात आपल्या तक्रारी दै.रायगड नगरीकडे सुनील पोतदार यांच्या नावाने पाठवावीत. जेणेकरून अलिबागच्या तहसीलदारांना जसा धडा शिकविला तशी कारवाई पनवेल प्रांतावर करणे सोयीचे होईल.

## कशेडी घाटात एसटी गाड्यांची समोरासमोर ठोकर



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा महामार्गावरील कशेडी घाटात दोन एसटी गाड्यांची समोरासमोर टक्कर झाल्याची घटना रविवारी रोजी पहाटे पावणेपाच वाजण्याच्या सुमारास धामणदिवी गावाच्या हद्दीत घडली आहे. अपघातात केवळ चालक किरकोळ जखमी झाला असून एकूण ५२ प्रवासी या दोन्ही बसमधून प्रवास करीत होते.


मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटामध्ये एसटी चालक समशेर नवाब तडवी हे आपल्या ताब्यातील मुंबई रत्नागिरी एसटीची गाडी क्रमांक (एमएच २० बीएल ३६९८) घेऊन रत्नागिरी दिशेने जात असताना कशेडी घाटात धामणदेवी गाव हद्दीत एका ट्रकला ओव्हरटेक करण्याच्या नादात विरुद्ध दिशेला जाऊन समोरून येणारी एसटी गाडी क्रमांक (एमएच १४ बीटी २५५७) चालक प्रतीक पुरुषोत्तम कदम हे खेड बाजूकडून देवाचे गोठणे ते बोरिवली गाडी घेऊन जात असताना रत्नागिरी दिशेने जाणाऱ्या गाडीची बोरिवली गाडीला जोरदार ठोकर लागून अपघात झाला.

या अपघातात चालक तडवी हे किरकोळ जखमी झाले आहेत. या दोन्ही एसटी गाड्यांमधून प्रत्येकी २६ प्रवासी प्रवास करीत होते. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

हा अपघात होताच पोलादपूर पोलीस व कशेडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मदत कार्य करीत वाहतूक सुरळीत केली. या अपघाताची नोंद पोलादपूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार जे. एस. लोखंडे हे करीत आहेत.

## जेएनपीएच्या दोन कामगार संचालक पदांसाठी आज निवडणूक : तीन कामगार संघटनांमध्ये चुरस

### पहाटे ५ वाजल्यापासून ६५२ कामगार बजावणार मतदानाचा हक्क



**दै.रायगड नगरी । उरण**

केंद्र सरकारने बंदर कायद्यात बदल करून जेएनपीटी बंदराचे २०२१ मध्ये पोर्ट ट्रस्ट ऐवजी पोर्ट ऑथोरिटीत रूपांतरण केले असून जेएनपीए बंदराच्या दोन कामगार संचालकांची पहिली निवडणूक आज पार पडण्यात येणार आहे. या निवडणुकीत चार प्रमुख कामगार संघटना निवडणूक लढवीत आहेत. निवडणुकीचा जाहीर प्रचार काल सायंकाळी ५ : ०० वाजता थांबला आहे. त्यानंतर आज मंगळवार १५ नोव्हेंबर रोजी पहाटे ५ : ०० ते सायंकाळी ५ : ०० वाजेपर्यंत जेएनपीए कामगार मतदान करणार आहेत.


जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट १९८९ ला सुरू झाले आहे. या बंदराचे कामकाज पाहण्यासाठी असलेल्या विश्वस्त मंडळात व्यवस्थापनासह दोन कामगार विश्वस्तांची ही निवड केली जात होती. सुरुवातीला ज्या कामगार संघटनेची सभासद संख्या अधिक आहे अशा संघटनेचे प्रतिनिधी विश्वस्त म्हणून नियुक्त केले जात होते. मात्र १९९९ मध्ये सी.आय. टी.यु.या कामगार संघटनेने केलेल्या मागणीनुसार कामगार विश्वस्त गुप्त मतदानाने निवडण्यात येऊ लागले.त्यामुळे बंदरातील निवडणुका गुप्त मतदानाने होऊ लागल्या आहेत.

मात्र २०21 मध्ये मेजर पोर्ट ऍक्टमध्ये बदल करून ट्रस्ट रद्द केल्या नंतर ही निवडणूक होत आहे. त्यामुळे या निवडणुकीला महत्व प्राप्त झाले आहे. केंद्रीय कामगार आयुक्तांच्या देखरेखीखाली होणाऱ्या या निवडणुकीत जेएनपीए बंदरा-तील एकूण ६५२ कामगार मतदान करणार आहेत. यामध्ये न्हावाशेवा बंदर (अंतर्गत) कामगार संघटनेचे माजी कामगार विश्वस्त भूषण पाटील,जेएनपीटी एकता कामगार संघटनेचे दिनेश पाटील व जेएनपीटी वर्कर्स युनियचे रविंद्र पाटील या तीन प्रमुख कामगार संघटनांमध्ये निवडणुकीची चुरस सुरु आहे. जेएनपीएच्या १३ संचालकापैकी मंडळात दोन कामगार प्रतिनिधी या निवडणुकीत निवडले जाणार आहेत.

निवडणुकीत ज्या कामगार संघटनेला प्रथम किंवा द्वितीय क्रमांकाची मते मिळतील त्यांचे प्रतिनिधी संचालक मंडळात कामगार प्रतिनिधित्व करणार आहेत. यामध्ये एक अपवाद वगळता १९९९ पासून भूषण पाटील हे कामगार विश्वस्त आहेत. तर

.../२

## सहकार मंत्री यांच्यासोबत अर्बन बँक ठेवीदारांच्या बाबत बैठक होऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल : किरीट सोमय्या



**दै.रायगड नगरी । पेण**

सहकार मंत्री यांच्या उपस्थितीत लवकरच बँक ठेवीदारांच्या बाबत संबंधितांची बैठक होऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल. अर्बन बँक संचालकांनी बँकेची जी लूट केली आहे. त्याबाबत कोर्टात खटला सुरू होण्याची मागणी ही करणार आहोत. एक लाख ६५ हजार ठेवीदारांना न्याय मिळावा यासाठी ही बैठक झाली. महिन्यापूर्वी ही सहकारमंत्री यांच्यासोबत मंत्रालयात मीटिंग झाली होती. आनंदाची बाब म्हणजे ईडी यांनी या प्रॉपर्टीची विक्री करण्यासाठी तयारी दाखविली. बँक आणि ईडीमध्ये जे वाद चालू होते ते मान्य केले आहे. ते प्रॉपर्टीवर आपला हक्क ठेवीदारांना पैसे परत मिळावे म्हणून ते कोर्टात मागे घ्यायला तयार आ-हेत. बँकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं बँकेने कोर्टात केलेला अर्ज मागे घेण्यात येईल. पुढच्या आठवड्यात दिल्लीला जाऊन ईडीच्या अधिकाऱ्यांशी बोलून कोर्टात जाऊन ईडी आपला हक्क मागे घेईल यासाठी प्रयत्न करणार. त्यामुळे काही प्रॉपर्टी विकण्यासाठी काढाव्या लागणार आहेत. बँकेने रिझर्व बँकेला पत्र देऊन पाच लाख व एक लाख देण्याची मागणी केली आहे परंतु पाच लाख देता येणार नाही असे इन्शुरन्स कळविले आहे त्यामुळे एक लाख रुपये मिळण्याची शक्यता आहे. असे किरीट सोमय्या यांनी पेण येथील अर्बन बँकबाबत माहिती देताना सांगितले.

७५ वर्षाची परंपरा

.../२

## वर्ल्ड कप फायनल स्पर्धेवर बेकायदेशीर पैश्यांचा जुगार लावणाऱ्यांवर खारघरमध्ये छापा

### गुन्हे शाखा कक्ष ३ ने चौघाजणांना घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर केसर बिल्डिंग नं.४ येथे रूम नं ७०२ या ठिकाणी काही इसम सध्या सुरू असलेल्या टी २० क्रिकेट वर्ल्ड कप मधील इंग्लंड विरुद्ध पाकिस्तान यांच्यातील फायनल स्पर्धेवर बेकायदेशीर पैश्यांचा जुगार खेळत असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष ३ चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांना मिळताच माळी यांच्या नेतृत्वाखाली अंमलदार यांचे पथक त्याठिकाणी छापा मारून चौघाजणांना ताब्यात घेतले आहे.

सदर छापेमारीत निलेश राजकुमार रामरखयानी (वय ३३), सुनिल राजकुमार मखिजा (वय ४३), सतिश गोविंद लोखंडे (वय ३४) व जयकुमार तिरथदास कुकरेजा (वय ३७) या चौकडीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. हे चौघेजण आपापसात संगनमत करुन लोकांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने व स्वत:च्या आर्थिक फायद्याकरिता http://goldenexch99.in व http://lotusbook247.com या वेबसाईटवर व SHUBHL-BH, LEDGER BOOK व Taj777. ink या ऍप्लीकेशनचा मोबाईल फोन, लॅपटॉपच्या माध्यमातून जुगार खेळण्याकरिता वापर करुन क्रिकेट मॅचच्या हारजीतवर सट्टा लावताना व घेताना करताना सापडले.

आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेले सॅमसंग तसेच ऍपल कंपनीचे एकूण २२ मोबाइल फोन, लेनोव्हो कंपनीचे २ लॅपटॉप, १ वायफाय राउटर असा एकूण ७ लाख ४५ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याबाबत खारघर पोलीस ठाणे

.../२

## डायबिटीज जनजागृती मॅरेथॉनचे आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

समाजात मधुमेहाविषयी जागरूकता आणि मधुमेह व्यवस्थापनात व्यायामाचे महत्त्व वाढवण्यासाठी रोटरी क्लब व रोटरॅक्ट क्लब ऑफ पनवेल होरायझन आणि डायबेटीस हेल्थ फाउंडेशन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष मॅरेथॉन नवीन पनवेल येथील डी मार्टसमोरील मैदानात आयोजित करण्यात आली होती. भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झेंडा दाखवून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

मधुमेह आणि त्याच्या संभाव्य गुंतागुंतीमुळे कुटुंब आणि समाजावर आरोग्यसेवेचा भार पडतो. या पार्श्वभूमीवर रोटरी क्लब व रोटरॅक्ट क्लब ऑफ पनवेल होरायझन आणि डायबेटीस हेल्थ फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने मधुमेहाने त्रस्त व उपचार घेऊ शकत नसलेल्या गरजू, गरीब लोकांसाठी इन्सुलिन बँक संकल्पना आखण्यात आली आहे. या इन्सुलिन बँकेच्या माध्यमातून गरजू रुग्णांना रेशनिंगच्या स्वरूपात इन्सुलिन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या मॅरेथॉनमधून येणार्या डोनेशन रकमेचा उपयोग डायबिटीस हेल्थ फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टकडून

.../२

# मराठी वळणाची प्रतीकात्मकता

तुम्ही 'ल' आणि 'श' कसे लिहिता? गाठयुक्त आणि दंडयुक्त की देठयुक्त आणि पाकळीयुक्त? पहिल्या पद्धतीने, म्हणजे 'ल', 'श' अशा प्रकारे लिहीत असाल, तर ते आता चुकीचे ठरतील. ते तुम्ही आता 'ल', 'श' असेच लिहायला हवे. कसेही लिहिले, तरी 'ल' आणि 'श' असेच वाचले जाणार असले आणि त्यांचा अर्थ बदलणार नसला, तरी हिंदी देवनागरी लिपीतील आक्रमण का म्हणून स्वीकारायचे, असा प्रश्न केला जात आहे. गेल्या किमान पन्नास वर्षांपासून शालेय पाठ्यपुस्तकात 'ल' असा दंडयुक्तच आहे; अनेक पिढ्यांनी हाच 'ल' शिकला आहे. त्यांना तो कधीच हिंदी वाटला नाही. हिंदी आणि मराठी यांसाठी एकच देवनागरी लिपी असल्याने, त्यातील काही अक्षरांना मराठी आणि काहींना हिंदी वळण आहे, हे त्यांच्या लक्षात आले नसेल! मात्र, आता हा बदल समजून घ्यावा लागेल आणि 'ल' व 'श' लिहिण्याचा बाबतीत सवयही बदलावी लागेल. या दोन अक्षरांबाबतची ही चर्चा खरे तर नवीन नाही. सन २००९च्या शासन निर्णयानंतर ती रंगली होतीच. आता ती पुन्हा नव्याने सुरू झाली आहे; कारण या शासन निर्णयाची सुधारित आवृत्ती नुकतीच जारी करण्यात आली आहे. त्यामधील 'लृ', 'ञ' ही चिन्हे कायम ठेवण्याबाबत किंवा प्रामुख्याने इंग्लिश शब्द उच्चारताना येणारी '' आणि 'ऑ' ही स्वरचिन्हे स्वीकारण्याबाबत फारसा वाद नाही. इंग्लिश स्वरांना मराठीने कधीच आपले केले आहे आणि 'लृ', 'ञ' यांचा वापर असलेले मोजके शब्द अजूनही वापरात आहेत. 'ख' हे अक्षर पूर्वी 'रव' अशा पद्धतीने लिहिले जायचे; परंतु त्यातील 'र'ची रेघ 'व'पर्यंत जोडण्याची पद्धत सुरू झाल्याने, 'ख' आणि 'रव' यांच्यातील भेद स्पष्ट होतो आहे. त्यामुळे याबाबतही वाद नाही. वादाचा मुद्दा आहे, तो 'ल' आणि 'श' या अक्षरांबद्दलचा. ती हिंदी वळणाची आहेत, म्हणून त्यांना नाकारून फक्त मराठी वळणाचे 'ल' आणि 'श' स्वीकारण्याचा निर्णय कितपत रास्त असा प्रश्न पडतो. मराठीत पूर्वी 'ल' आणि 'श' ही अक्षरे अशीच लिहिली जात; परंतु टंकलेखन आणि मुद्रण यांच्यासाठी हिंदी वर्णमालेतील अक्षरांचा स्वीकार केला गेला, हे खरे. आताही संगणकासाठीच्या बहुतेक प्रणालीत हिंदी वळणाचीच अक्षरे आहेत. त्यामुळे पूर्वीची चूक आता सुधारली जात असल्याची भूमिका अयोग्य नाही; मात्र गाठयुक्त 'श' आणि दंडयुक्त 'ल' यांचा वापर केल्याने त्यांचा अर्थ बदलत नाही, हे लक्षात घ्यायला हवे. याबाबतीत भाषिक अस्मिता आणि अभिनिवेशा यांतून पाऊल न उचलता, भाषा आणि लिपी यांच्यातील फरक लक्षात घेऊन, भाषेसाठी अधिक व्यापक कृती करणे आवश्यक आहे. भाषा आणि लिपी या दोन स्वतंत्र बाबी आहेत. लिपी म्हणजे सांकेतिक चिन्हांचा संच. त्या त्या भाषांतील सर्व प्रकारचे ध्वनी विविध चिन्हांद्वारे दर्शविता येणे आणि त्यानुसार वाचता येणे हे लिपीचे काम. प्रत्येक भाषेला लिपी असतेच असे नाही. एकच लिपी अनेक भाषांसाठी वापरली जाते; रोमन आणि अरबी लिपी ही याची उदाहरणे. आपल्याकडेही देवनागरी लिपी ही मराठी, हिंदी, संस्कृत यांसह अनेक भाषांसाठी वापरली जाते. भाषेनुसार थोडाफार फरक लिपीत असू शकतो. त्या त्या भाषिकांचा परस्परांशी संपर्क वाढला, की अनेक गोष्टींचे आदान-प्रदान होते. एकमेकांचे शब्द, वाक्प्रचार, म्हणी स्वीकारल्या जातात आणि लिहिताना आपली भाषा अधिक नेमकेपणाने व्यक्त होण्यासाठी सुधारणाही केल्या जातात. हिंदी देवनागरीत पूर्वी 'अ', 'झ' ही अक्षरे क्लिष्ट पद्धतीने लिहिली जात. आता ती मराठी देवनागरीप्रमाणे लिहिली जातात. '' आणि 'ऑ' ही स्वरचिन्हे हिंदीने दीर्घ काळ स्वीकारली नव्हती; मात्र आता त्यांचा वापर होतो आहे. जागतिकीकरणाच्या आजच्या काळात विविध भाषिकांशी संपर्क वाढत आल्याने, नवनवीन शब्दांचा स्वीकार वाढत असताना आपल्या लिपीतील दोन अक्षरांबद्दल आग्रह धरणे योग्य ठरणारे नाही. मराठी भाषा परिपूर्ण आणि समृद्ध व्हावी, यासाठी ती अधिक संपन्न करणे, ज्ञान-विज्ञान मराठीत आणणे आणि मुख्य म्हणजे सर्व प्रकारचे व्यवहार मराठीतून होणे आवश्यक आहे. त्यासाठी केवळ अस्मितेचा फणा काढून किंवा अभिनिवेश बाळगून चालणार नाही. त्यासाठी गरज आहे ती योग्य धोरणांची आणि कृतीची. प्रत्येकी तीन-चार कोटी किंवा त्याहून कमी भाषक असलेल्या जर्मन, फ्रेंच, कोरियन, जपानी, अरबी आदी किती तरी भाषा समृद्ध आहेत; कारण त्या भाषा ज्ञान-विज्ञानाच्या, उद्योग-व्यापाराच्या आणि व्यवहाराच्या बनल्या. त्यासाठी त्या त्या भाषकांनी सातत्याने प्रयत्न केले. वेगवेगळे कोश लिहिले गेले, नवीन ज्ञान आणि विज्ञान त्या भाषांत आणले गेले आणि तेथील लोक स्वभाषेतूनच बोलत-लिहीत राहिले. अशा प्रकारे आपल्या भाषेबद्दल वृथा नव्हे, तर रास्त अभिमान असणे आणि त्यासाठी केवळ सरकारने नव्हे, तर समाजाने प्रयत्न करणे कळीचे ठरते. तसे झाले, तर आपली भाषा संपन्न होईल, यात शंका नाही. त्यामुळे अशा प्रयत्नांसाठी पावले पडायला हवीत. मराठीच्या भल्यासाठी आग्रही भूमिका घ्यायलाच हवी; परंतु ती अक्षरांचे वळण मराठी ठेवण्यापुरती प्रतीकात्मक असून चालणार नाही. यापेक्षा किती तरी कृतिशील गोष्टी मराठीसाठी करता येणार आहेत. त्यांबाबत आग्रही न राहणे मराठीसाठी अधिक धोकादायक आहे.

# जनसंपर्क कार्यालयामध्ये सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याच्या अनुषंगाने प्रामाणिकपणे प्रयत्न केले जातील : रामदास शेवाळे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयातून गोरगरीब, सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याच्या अनुषंगाने कामे होणार आहेत. हे कार्यालय जनतेचे असून येथे येणारा कोणीही खाली हात जाणार नाही असा आत्मविश्वास शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख रामदास शेवाळे यांनी व्यक्त केला.



कळंबोली सेक्टर ४, प्रभाग क्रमांक ८ मध्ये शिवसेना कार्यालयाचे उद्घाटन रामदास शेवाळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याच्या नेतृत्वाखालील सरकार जनतेच्या हिताचे निर्णय घेत असल्याने त्यांना सर्व स्तरातून वाढता पाठिंबा मिळत आहे बाळासाहेबांच्या शिवसेनेने राजकीय विस्तार करण्यास सुरुवात केली आहे.

पक्ष संघटना मजबूत आणि बळकट करण्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पक्षाचे सचिव संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गक्रमण सुरू आहे. कळंबोली वसाहतीमध्ये बाळासाहेबांची शिवसेनेने विस्तारण्यास सुरुवात केली आहे. शहर प्रमुख आणि इतर पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

रामदास शेवाळे यांच्या हस्ते नारळ वाढवून आणि फीत कापून एक प्रकारे जनसंपर्काचा शुभारंभ करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकहिताच्या दृष्टिकोनातून अनेक कामे गेल्या काही महिन्यांमध्ये केले आहेत. निर्बंध हटवल्यामुळे दहीहंडी, गणेशोत्सव, दीपावलीचा सण मोठा उत्साहात नागरिकांना साजरा करता आला. सर्वसामान्यांच्या हितासाठी शिंदे- फडणवीस सरकारने अनेक निर्णय घेतले असल्याचेही रामदास शेवाळे यांनी सांगितले. मुख्यमंत्री महोदयांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालले असल्याचे ते म्हणाले. ते तळागळातील सर्वसामान्य जनतेचे मुख्यमंत्री असून लोकांच्या प्रश्नांची जाण असणारे नेतृत्व असल्याचेही रामदास शेवाळे यांनी सांगितले. कळंबोली या ठिकाणी सुरू करण्यात आलेल्या जनसंपर्क कार्यालयामध्ये सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याच्या अनुषंगाने प्रामाणिकपणे प्रयत्न केले जातील. रहिवाशांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्याची सोडवणूक केली जाईल अशी ग्वाही यावेळी शेवाळे यांनी दिली.

रामदास शेवाळे यांच्या हस्ते नारळ वाढवून आणि फीत कापून एक प्रकारे जनसंपर्काचा शुभारंभ करण्यात आला. शहर प्रमुख तुकाराम सरक यांनी संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांचे स्वागत केले. या कार्यक्रमाला भाजपचे स्थानिक नेते बबन बारगजे सुद्धा उपस्थित होते. त्यांनी मित्र पक्षाच्या या जनसंपर्क कार्यालयाला शुभेच्छा दिल्या.

# कर्जत मधील लोक न्यायालयात ४५२ प्रकरणे निकाली

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत येथील दिवाणी न्यायालयामध्ये लोक न्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. या लोक न्यायालय मध्ये तडजोडीसाठी एकूण दिवाणी व फौजदारी २१९ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ३६ प्रकरणे निकाली निघाली तसेच वाद पूर्वप्रकरणे ४२२२ ठेवण्यात आली होती त्यापैकी ४१६ प्रकरणे निकाली निघाली तसेच वादपूर्व प्रकरणांमध्ये तडजोडी पोटी एकूण १४, ४८, ५६५ रुपये इतकी वसुली झाली.

या लोक न्यायालयाचे कामकाज कर्जत तालुका निधी सेवा समिती अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश एस. आर. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले तसेच सदरील लोक न्यायालय मध्ये पॅनल एडवोकेट म्हणून जेष्ठ वकील अॅड.राजेंद्र निगुडकर यांनी काम पाहिले. पॅनलला विशेष सहकार्य कर्जत बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड.अरुण नायक तसेच इतर सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले.

याप्रसंगी अॅड.अजय मेढी,अॅड. दीपक गायकवाड, अॅड.सनी डीमेलो, अॅड.मोतीलाल ओसवाल या जेष्ठ वकिलांसह अॅड.प्रदीप सुर्वे, अॅड.दीपक पादिर, अॅड.समीर लाड,अॅड.महेश घारे, अॅड.मनोज क्षीरसागर, अॅड.रविकर गायकवाड,अॅड.निलेश पादिर,अॅड.प्रविण खडे,अॅड.अक्षय भोपतरावअॅड.संदीप घरत,अॅड.पूजा सुर्वे,अॅड.हिना शेख, अॅड.रुचिरा दगडे, अॅड.हिनल ओसवाल, अॅड.वर्षा कोचुरे आदी उपस्थित होते.

# तीन कोटींच्या क्रीडासंकुलासाठी आ.गोगावले यांची मुख्यमंत्र्यांना विनंती : कळंबे

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी योग्य क्रीडांगणाची तरतूद करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही दिलेली आश्वासनं आता आ.गोगावले हे मुख्यमंत्री ना.शिंदे यांच्या माध्यमातून पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्नशील असून तीन कोटींच्या क्रीडासंकुलासाठी आ.गोगावले यांनी मुख्यमंत्र्यांना विनंती केल्यानुसार नजिकच्या काळात रानबाजिरेतील एम आयडीसी धरणालगतचे भुसंपादीत क्षेत्र या क्रीडासंकुलासाठी निश्चित करण्यात येणार आहे, अशी माहिती रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी दिली.

पोलादपूर तालुक्यातील लोहारे देऊळकोंड येथील साने गुरूजी माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणावर ७ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर २०२२ पर्यंत चालणाऱ्या तालुकास्तरीय क्रीडास्पर्धेचे बालदिनी मध्यावधी उदघाटन चंद्रकांत कळंबे यांच्याहस्ते करण्यात आले असता नायब तहसिलदार समीर देसाई, गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे, माजी राजिप सदस्या सुमन कुंभार, माजी पं.स.सदस्य यशवंत कासार, सहयोग प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनायक चित्रे, विभावरी चित्रे, कार्याध्यक्ष रमेश चव्हाण, मुख्याध्यापिका सुगंधा वाढवळ, क्रीडा शिक्षिका शुभांगी उतेकर, रंजना जाधव तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी सुरवसे सरांना वसंत स्मृती पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा राजिप माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी दीपक सकपाळ यांनी क्रीडा समितीच्या वतीने प्रास्ताविक केले. याप्रसंगी पंचायत समिती सदस्य यशवंत कासार यांनी, विद्यार्थ्यांना मोबाईलमधून बाहेर आणून प्रत्यक्ष मैदानी खेळाची आवड निर्माण करण्याची गरज असल्याचे यावेळी सांगितले. याप्रसंगी माजी राजिप सदस्या सुमनताई कुंभार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तीमत्वातून गुणग्राहकता विद्यार्थ्यांनी अंगिकारल्यास क्रीडा क्षेत्रात नावलौकीक प्राप्त करता येईल, असे मत व्यक्त केले. सहयोगचे कार्याध्यक्ष रमेश चव्हाण यांनी साने गुरूजी विद्यालयाकडे येणारा रस्ता डांबरीकरण करून वाहतुकीस उपयुक्त करण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी सुभाष ढाणे, सुखदेव मोरे, विनय हाटे, लिलाजी शेडगे आदींनी शिक्षक व शिक्षकेतर वृंद तसेच तालुका क्रीडा समिती सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली या क्रीडास्पर्धेचे आयोजन केले. भरद‌ुपारी एक ते पावणे तीन वाजेपर्यंत हक्काचे प्रेक्षक असलेल्या बालक्रीडापटूंना बालदिनानिमित्त श्रोते बनविण्यात आले. यावेळी वर्गखोल्यांचे तसेच सीसीटिव्ही कॅमेरायंत्रणेचे उदघाटनही चंद्रकांत कळंबे यांच्याहस्ते करण्यात आले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## जेएनपीएच्या दोन कामगार संचालक पदांसाठी आज निवडणूक

दिनेश पाटील ही अनेक वर्षे विश्वस्त म्हणून निवडून येत आहेत.रविंद्र पाटीलही एकवेळा जेएनपीटीच्या विश्वस्त पदी विराजमान झाले होते.या निवडणूकीचा प्रचार राजकीय निवडणुकी प्रमाणेच सुरू असून कामगारांना अनेक आश्वासने दिली जात आहेत.या निवडणुसाठी आज मतदान होत आहे.या तीन उमेदवारातून कोणते दोन उमेदवार बाजी मारतात, याकडे जेएनपीए बंदर विभागासह संपूर्ण उरण तालुक्याचे लक्ष वेधले आहे.

## बैठक होऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल : किरीट सोमय्या

असलेल्या अर्बन बँक घोटाळ्याला एक तप होऊन गेला आहे. पेण अर्बन बँक २०10 ला बुडीत निघाली आणि रायगडसह मुंबईत हाहाकार माजला. सहकार क्षेत्राला मोठा हादरा बसला होता. ठेवीदार व खातेदार आपले पैसे कधी मिळतील या आशेवर आहेत. त्यामुळे बँकेबाबत कोणीही पुढाकार घेतला की ठेवेदार व खातेदारांना आशेचा किरण दिसून येतो. पेण अर्बन बँकेच्या मुख्य कार्यालयात भाजप खासदार किरीट सोमय्या यांनी भेट देऊन बँकेबाबत संबंधिताबरोबर चर्चा केली. त्यांच्या भेटीकडे ठेविदारांचे लक्ष लागले आहे. पेण देवेंद्र फडणवीस रवींद्र पाटील यांच्या प्रचारासाठी आले होते त्यावेळी बँक ठेविदारांचे भरलेले पैसे असे त्यांनी आश्वासन दिले होते त्यानंतर फडवणीस मुख्यमंत्री झाले आता उपमुख्यमंत्री झाले विरोधी पक्ष नेते होते अजूनही बँकेचा प्रश्न सुटला नाही नगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर किरीट सोमय्या आले असल्याची चर्चा पेणमध्ये चर्चा सुरू असून पुन्हा एकदा अर्बन बँक देवीदारांना फक्त आश्वासनच का? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

यावेळी किरीट सोमय्या यांच्यासह पेण विधानसभा मतदारसंघाचे आमदार रवीशेठ पाटील, पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर,नरेन जाधव, राजेश मपारा, नगराध्यक्ष प्रीतम पाटील, वैशाली कडू, अशोक जैन, मिलिंद पाटील, ललित पाटील, शांता भावे यांच्यासह खातेदार- ठेवीदार मोठया संख्येने उपस्थित होते.

## पैश्यांचा जुगार लावणाऱ्यांवर खारघरमध्ये छापा

येथे गुन्हा नोंद करण्यात आला असुन नवी मुंबई अप्पर पोलीस आयुक्त व पोलीस उपायुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनानुसार वरीष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी हे पुढील तपास करीत आहेत.

## डायबिटीज जनजागृती मॅरेथॉनचे आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन

इन्सुलिन बँक उभारणीसाठी केला जाणार आहे. दोन गटांत झालेल्या या मॅरेथॉनमध्ये सुमारे ५००हून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला. या उपक्रमाला रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व अन्य सेवाभावी संस्थांनी हातभार लावला. विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. या वेळी माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, रोटरी क्लब ऑफ पनवेल होरायझनचे अध्यक्ष स्वप्नील गांधी, सेक्रेटरी विनीत परमार, खजिनदार अंकित शहा, डायबेटिस हेल्थ फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. गणेश हांडे, खजिनदार स्वाती हांडे, सेक्रेटरी कविता बोराडे, ट्रस्टी अमित धवडे, रोटरॅक्ट क्लब ऑफ पनवेल होरायझनच्या अध्यक्ष इशा शिंदे, रोटरी सदस्य अभिजीत सावळेकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# कोकण दिंडीचे आ.अनिकेत तटकरे यांच्याकडून स्वागत

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातून रोहे ते आळंदी पायी वारी दिंडीचे आ.अनिकेत तटकरे यांनी प्रेमपुर्वक स्वागत करून जेष्ठ वारक-यांचे आशिर्वाद घेतले.

या दिंडीचे प्रमुख असलेले रायगड भूषण गुरूवर्य ह.भ.प.पुरूषोत्तम महाराज पाटील उर्फ बापू यांच्या मार्गदर्शनाखाली गेली अनेक वर्षे रोहे ते आळंदी पायी वारी दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात संपन्न होत आहे.या दिंडी सोहळ्यात केवल रोहे तालुक्यातीलच नव्हे तर समस्त रायगड जिल्ह्यातील मोठ्या संख्येने भाविक भक्त सहभागी होऊन या दिंडी सोहळ्याची शोभा वाढवित आहेत.

तर खा.सुनील तटकरे,आ.आदिती तटकरे वआ.अनिकेत तटकरे यांचेही या दिंडी सोहळ्यास मोठे योगदान लाभत आले आहे.

त्याच अनुषंगाने आ.अनिकेत तटकरे यांनी या पायी वारी दिंडी सोहळ्यास सदिच्छा भेट देऊन जेष्ठ वारक-यांचे आशिर्वाद घेतले व आपली प्रेमाची भेट म्हणून सर्व वारकरी बंधू आणि भगिनी यांना वारकरी बॅगा भेट देण्यात आल्या.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मौजे : उमरोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक शिल्पा मिलींद कुलकर्णी यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : उमरोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ. क्र. | भूमापन/गट क्रमांक | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | पोट खराबा | एकूण | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५ | १२ | ०-१७.०० | ०-०५.०० | ०-२२.०० | ०.२५ |
| २ | ३३ | ८ | ०-१३.०० | ०-००.०० | ०-१३.०० | ०.२५ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आमच्या खालील प्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकती वरील शिल्पा मिलींद कुलकर्णी यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.१४/११/२०२२

सही/-
**अॅड.किरण एम.गवते**
**मु.पो.नेरे, ता.पनवेल,**
**जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.८६५२०४८४५३**

अॅड.इर्शाद र. शेख

### जाहीर नोटीस

मे.जिल्हा न्यायाधिश, पनवेल रायगड यांचे न्यायालयांत
दि.चौ.अर्ज क्र.९४/२०२२
ने.ता.२१/१२/२०२२

श्रीमती.सलमा मैनुद्दीन शेख
वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१४६ ई, हसनभाई मंझिल,
मु.ओवे पेठ, पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी कु.शाईसता मैनुद्दीन शेख यांचा खालील मिळकतीसंदर्भात अज्ञान पालक म्हणून घोषित करून मिळणेकरिता मा.न्यायालयात गार्डीयन अॅण्ड वॉर्डस अॅक्ट, १९८० चे कलम २९ व ३१ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

पै.मैनुद्दीन हसन शेख यांच्या नावे मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील सेक्टर ३५ ई, मधील सिडको भूखंड क्रं.०३, वरील मंजिरी पॅराडाईज या इमारतीचे सी विंग मधील, सहाव्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रं.सी-६०२, क्षेत्र ५६१.९८४ चौ.फूट बिल्टअप अधिक टेरेस क्षेत्र ४५ चौ.फूट अशी मिळकत स्थित आहे.

वर सविस्तरपणे नमूद केलेल्या सदनिका क्रं.सी-६०२ मध्ये अर्जदार श्रीमती.सलमा मैनुद्दीन शेख हिचा ६.२५ टक्के, आणि शाईसता मैनुद्दीन शेख हिचा १६.६६ टक्के हिस्सा आहे.

वर नमूद मिळकतीसंदर्भात अर्जदार यांनी कु.शाईसता मैनुद्दीन शेख यांचे अज्ञान पालक असल्याचा दाखला मिळणेकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांस पालकत्वाचा दाखला देणेबाबत कोणाचीही हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत हरकत सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदाराकडून कायदेशीर साक्षीपुरावे नोंदवून अर्जदारास पालकत्वाचा दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.१४/११/२०२२ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/- क.लिपीक जिल्हा न्याया, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक जिल्हा न्याया, पनवेल**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सयौ.स्नेहा मधुकर हरमलकर वय : ६८ वर्षे, गृहिणी, रा.बालाजी प्रसाद सोसायटी रुम नं.अ/२०३, प्लॉट नं.११, से.७, कामोठे, नवी मुंबई यांच्या ताब्यातील यांचा रजिस्ट्रेशनची मुळ प्रत बालाजी प्रसाद सोसायटी रुम नं.२०३, प्लॉट नं.११, से.७, कामोठे, बिल्डर तुळजाभवानी डेव्हलपर्स व भाऊ गणपत जाधव विक्रीचा करारनामा (Agreement to sale) कामोठे परिसरातून पायी जात असताना गहाळ झालेली आहे. त्याबाबतची नोंद कामोठे पोलीस ठाणे नवी मुंबई दि.१३/११/२२ रोजी मिसिंग रजिस्टर नं.१६२३/२०२२ अन्वये कायदेशीर तक्रार नोंदविलेली आहे.

तरी सदर गहाळ झालेल्या दस्ताची मुळ प्रत कोणालाही सापडली असल्यास अथवा सापडल्यास संबंधित व्यक्तीने सदरचा दस्त आमच्या खाली दिलेल्या पत्यावर ७ दिवसांच्या आत आणून द्यावी. सदरच गहाळ झालेल्या दस्ताने कोणत्याही व्यक्तीस परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणतेही हक्क निर्माण होणार नाहीत यांची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट

बालाजी प्रसाद सोसायटी, रुम नं. अ/२०३, प्लॉट नं.११, से.७, कामोठे, नवी मुंबई

सही/-
**अॅड.रश्मी ब.जाधव**
**मरिआई बिल्डींग, बी-विंग,**
**००३, कोप्रोली, पो.नेरे,**
**ता.पनवेल-४१०२०६, जि.रायगड**
**मो.नं.९७७३२६४२००**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत श्री.काळु तुकाराम पाटील वगैरे इतर यांचे नावे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी जमीन मालक म्हणून आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.काळु तुकाराम पाटील वगैरे इतर | ९/२ | ०-४८-७० यापैकी विक्री क्षेत्र ०-२४-३५ | ८-५० |

मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार श्री.काळु तुकाराम पाटील वगैरे इतर यांची वरील नमूद शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताने अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या शेतजमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद जमीन मालक / कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेला कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.१४/११/२०२२

सही/-
**अॅड.मयुरेश प्र.हनुमंते**
**शॉप नं.बी/१०१, योगेश्वर**
**कृपा बिल्डींग, ठाणा नाका**
**रोड, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कोलाड लायन्स क्लब तर्फे जेष्ठ नागरिकांची १०४ जणांची मधुमेह तपासणी

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

१४ नोव्हेंबर २०२२ रोजी जागतिक मधुमेह दिन साजरा होत आहे. त्या निमित्ताने रविवारी १३ नोव्हेंबर २०२२ रोजी आपल्या लायन डिस्ट्रिक्ट च्या वतीने इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये सकाळी ९ ते दुपारी ३ या कालावधीत ६००० जणांची मधुमेह तपासणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यातील सहभाग म्हणून लायन्स क्लब ऑफ कोलाड रोहाच्या वताने करीत मधुमेह तपासणी शिबीरात कोलाड परिसरातील जेष्ठ नागरिक यांची एकूण १०४ जणांची मधुमेह तपासणी करण्यात आली. ग्रुप ग्राम पंचायत आंबेवाडी येथील जेष्ठ नागरिक सभागृह कोलाड येथे ठीक सकाळी ९ ते दुपारी ३ या कालावधीत हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

सदरच्या आयोजित शिबिराला आंबेवाडी ग्राम पंचायतीचे सरपंच सुरेशदादा महाबळे, रोहा तालुका पेन्शनर संघटना व कोलाड विभागीय जेष्ठ नागरिक संघटना अध्यक्ष मारुती राऊत, जेष्ठ महिला संगटक सौ प्रणिता गांधी, प्रावीण गांधी, दगडू बामुगडे, यांच्या प्रमुख उपस्थितीत यावेळी डॉ. विनोद गांधी, नंदकुमार कळमकर,विजय गोतमारे, यांनी उपस्थित नागरिकांची शुगर तपासणी केली.तर इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस करता निरिक्षक म्हणून रोहा खांब येथील रा.ग.पोटफोडे विद्यालय व कै द ग तटकरे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सुरेश जंगम सर यांनी काम पाहिले. उत्स्फुर्तपणे प्रतिसाद लाभलेल्या या शिबिरात यावेळी कोलाड रोहा लायन्सक्लबचे उपाध्यक्ष नरेश बिरगावले, सेक्रेटरी रविंद्र लोखंडे,खजिनदार डॉ श्यामभाऊ लोखंडे,गजानन बामणे,अनिल महाडिक,राजेंद्र कोप्पू,विश्वास निकम,दिनकर सानप,महेश तुपकर,सौ पूजा लोखंडे,विठ्ठल सावळे,प्रसाद लोखंडे हे लायन्स क्लब कोलाड रोहाचे सदस्य सहभागी झाले होते. लायन्सक्लबचे अध्यक्ष डॉ सागर सानप यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर आयोजित करण्यासाठी जेष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष मारुती राऊत,प्रवीण गांधी,सौ प्रणिता गांधी,दगडू बामुगडे,तसेच आंबेवाडी ग्राम पंचायतीचे विद्यमान सरपंच सुरेशदादा महाबळे यांनी सहकार्य केले.



## उरण येथील समाज प्रबोधन हायस्कूलमध्ये असंघटित कामगारांना मार्गदर्शन कार्यशाळा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण येथील समाज प्रबोधन शिक्षण संस्थेच्या हायस्कूल आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या वतीने असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये कामगार संघटनेचे सल्लागार तथा माजी निवृत्त कामगार आयुक्त अधिकार शाम जोशी हिंद मजदुर सभा सलग्न जनरल मजदुर सभा व टेक्सटाइल कामगार सभा ठाणे जनरल सेक्रेटरी प्रशांत शेट्ये,जगदीश उपाध्याय, कोकण श्रमिक संघ पनवेल खजिनदार एकनाथ ठोंबरे, कार्यशाळा आयोजक सुनिल विश्वनाथ जोशी,शाम जोशी यांनी कामगार कायदे व ईश्रम कार्ड इमारत बांधकाम कल्याणकारी मंडळ बोर्ड घरेलु कामगार मंडळ बोर्ड यांची उपस्थितांना माहिती दिली. त्यामध्ये नोंदणी करणे बाबत आवाहन केले. यावेळी जगदीश उपाध्याय, प्रशांत शेट्ये, एकनाथ ठोंबरे यानींही उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी चार फाटा नाईकनगर ठाकुरनगर एंजल गेट ओएनजीसी येथील नाका कामगार व झोपडट्टीवासीय महिला पुरूष युवा कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. राम झिने, कैलास राठोड, प्रकाश शरणागत,खडसे ताई,रंजनाताई यांनी आपल्या समस्या यावेळी मांडल्या.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत १) अक्षता अनंता म्हात्रे २) नितीन अनंता म्हात्रे यांचे नावे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी जमीन मालक म्हणून आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १) अक्षता अनंता म्हात्रे<br>२) नितीन अनंता म्हात्रे | ११३/२/१ | ०-७१-५०<br>यापैकी विक्री<br>क्षेत्र ०-४०-० | ६-६० |

मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार १) अक्षता अनंता म्हात्रे २) नितीन अनंता म्हात्रे यांची वरील नमूद शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताने अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या शेतजमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद जमीन मालक / कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेला कायम खरेदीखाताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.१४/११/२०२२

सही/-
**ॲड.मयुरेश प्र.हनुमंते**
शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग, ठाणा नाका रोड, ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.८२८६९२१३३३

# संगीत शास्त्र सौंदर्य तत्व संकल्पनेला उजाळा देणारा कार्यक्रम

## पंडित उमेश चौधरी यांच्या शास्त्रीय गायनाने रसिक श्रोते मंत्रमुग्ध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सुप्रसिद्ध सतारवादक उस्ताद अझीम खान यांच्या संकल्पनेनुसार बोरिवलीतील प्रबोधनकार ठाकरे लघुनाट्यगृहात झालेल्या 'घराणा रंग' या संगीत संवादात्मक उत्सवात पनवेलचे सुपुत्र तथा सांस्कृतिक सेलचे तालुका अध्यक्ष संगीत विशारद रायगड भूषण पंडित उमेश चौधरी यांच्या शास्त्रीय गायनाने रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले. संगीत शास्त्र सौंदर्य तत्व आधारित संकल्पनेला उजाळा देणारा कार्यक्रम ठरला, त्यामुळे रसिकांनी या पर्वणीचा आनंद घेतल्याची पोचपावती त्यांची प्रशंसा करताना दिली.

संतांची भूमी असलेल्या महाराष्ट्राला संस्कृती आणि कलेचा वारसा आहे. त्यामुळे विविध क्षेत्रातील कलाकारांची मांदियाळी आहे. अशातच अनेक तप संगीत साधनेची सेवा करणारे या भूमीला लाभले आहेत.

त्या अनुषंगाने शास्त्रीय संगीत साधनेचा जागर नवीन पिढीला अवगत व्हावा, यासाठी




नादब्रह्म परिवार बोरिवलीच्या वतीने पंडित उमेश चौधरी यांच्या संगीत सुरमयी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रख्यात गायक उमेश चौधरी, संगीत शास्त्र तज्ज्ञ उस्ताद अजीम खान आणि संगीत रत्नाकर ग्रंथाचे निष्णात प्राचार्य विजया पाटील यांच्या सहभागाने झालेल्या या संगीत कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला रागदारी संगीतामधील अविर्भाव, तिरोभाव या संगीत सौंदर्य तत्वांचे महत्व आणि त्याचे विश्लेषण पंडित उमेश चौधरी यांच्याकडून संगीत श्रोत्यांनी व विद्यार्थ्यांनी जाणून घेतले. या नंतर उमेश चौधरी यांनी आपल्या गायनाला प्रारंभ राग भिमपलासच्या 'बडा खयाल'ने केला. त्यानंतर राग खमाज, तिलंग व सोहनी रागातील बंदिशी गाऊन श्रोत्यांची मने जिंकली. शेवटी अबीर गुलाल, हेचि दान देगा हि भजने सादर करून भगवान पांडुरंगाच्या गजराने नाट्यगृह दुमदुमले होते. यावेळी उमेश चौधरी यांना तबल्यावर किशोर पांडे, पखवाज सुनील म्हात्रे, संवादिनीवर भक्ती ब्रहो घैसास, तानपुरा मंगेश चौधरी, अक्षय चौधरी तर टाळ वर मधुरा म्हात्रे यांची साथ लाभली.

दोन तपहुन अधिक काळापासून पंडित उमेश चौधरी यांनी आपल्या अथक साधनेने गायन कलेवर प्रभुत्व निर्माण केले आणि या गायन तपस्येतून त्यांनी अनेक पुरस्कार, मानसन्मान, नामांकने मिळवली असून संपूर्ण देशभर त्यांच्या शास्त्रीय गायन कार्यक्रमाचे आयोजन विविध संस्थांकडून होत असते.

त्याच अनुषंगाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रख्यात गायिका विदुषी अर्चना कान्हेरे, सतारवादक उस्ताद अजीम खान, सरोद वादक विवेक जोशी, विदुषी लता रानडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## कर्जत मध्ये रक्तदान शिबिरात ९३ रक्तदात्यांचे रक्तदान

**दै.रायगड नगरी । कर्जत**

गीता जयंती निमित्ताने विश्व हिंदू परिषद-बजरंग दल कर्जत प्रखंड, मातृ सक्ती, दुर्गा वहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने घटकोपरच्या समर्पण रक्तपेढीच्या सहकार्याने कर्जतमध्ये रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात ९३ रक्तदात्यांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी संयोजित केलेले कर्जत खालापूर तालुक्यातील ४६२ वे रक्तदान शिबिर ठरले.

कर्जत शहरातील श्री कपालेश्वर मंदिराच्या सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन नगरसेविका स्वामीनी मांजरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष सतीश श्रीखंडे, कुलाबा जिल्हा बजरंग संयोजक साईनाथ श्रीखंडे, कर्जत प्रखंड मंत्री विशाल जोशी, प्रखंड अध्यक्ष विनायक उपाध्ये आदी उपस्थित होते. सर्वप्रथम रोशन अगज आणि कौस्तुभ करमरकर यांनी रक्तदान करून रक्तदानाचा शुभारंभ केला. या शिबिरात ९३ रक्तदात्यांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. समर्पण ब्लड सेंटर, घाटकोपरच्या डॉ. एम. ए. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली स्नेहल कांबळे, लक्ष्मण नाईक, प्रदीप नितोरे, सोहन जाधव, अनिकेत जाधव, सूरज जाधव, राजेश विश्वकर्मा, विजय मोहिते यांनी रक्तसंकलन केले. याप्रसंगी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, राजाभाऊ कोठारी, सुनील गोगटे, दिनेश रणदिवे, गणेश ठोसर, बिनीता घुमरे, दीपक बेहेरे, दिपक गायकवाड, प्रसन्न खेडकर, कमलाकर किरडे, दया हजारे, सचिन ठाकूर, केदार भडागवकर , मयुरेश चौधरी , प्रतीक पाटील , अनंता हजारे, विनोद बडेकर, दीपक डवरी, अविनाश बैलमारे, रोहित चव्हाण, दिलीप कवाडकर आदी उपस्थित होते.

# बनावट सोने तारण कर्जाच्या पावतीद्वारे ११ लाखांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तारण ठेवलेल्या सोन्याचे पैसे भरल्यानंतरदेखील सोने न देता तसेच भरलेले पैसे परत न दिल्याप्रकरणी एका तरुणाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अब्दुल मजीद खान असे त्याचे नाव आहे.

खारघर, सेक्टर २० येथील राजेश ओस्तवाल यांचे राजलक्ष्मी ज्वेलर्स, सेक्टर १३, खारघर येथे दुकान आहे. त्यांच्या दुकानात काम करणारा अर्जुन सिंग दसाना याला अब्दुल मजीद खान यांचा फोन आला. त्याला मजीद याने बेलापूर, सीबीडी येथे सोने तारण ठेवले असून ते सोडवण्यासाठी ३ लाखांची गरज असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे अर्जुन सिंग दसाना याने त्या इसमाकडून पावती घेऊन मुथूट फायनान्स बेलापूर येथे २ लाख ४५ हजार रुपये भरले व त्याचे सोने सोडवले.

या सोन्याचे मूल्यमापन केले असता, त्याची किंमत जास्त झाली व त्यामुळे ५९ हजार रुपये अब्दुल मजीद खान यास दिले व ते सोने विकत घेतले. त्यानंतर पुन्हा अब्दुल खान याने एका बँकेत सोने तारण ठेवले असून, ते सोडवण्यासाठी ११ लाख रुपये हवे असल्याचे सांगितले. या वेळी त्याने पटेल ज्वेलर्स, पनवेल, मारुती ज्वेलर्स उलवे येथे सोने बनवल्याच्या पावत्या पाठवल्या व १० लाख ८३ हजार रुपये तारण ठेवल्याची त्याच्या नावाची पावती अर्जुन यांच्या व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवली. या वेळी अंदाजे ३२९ ग्राम सोने पैसे भरून सोडवून तो आम्हाला विकेल व बँकेचे पैसे भरून उरलेले वरचे पैसे त्याला द्यायचे, असा व्यवहार त्यांच्यात ठरला. त्यानुसार ११ लाख रुपये अब्दुल खान यांच्या खात्यात जमा करण्यात आले.

पैसे भरल्यानंतर अनेक वेळा सोने देण्यास सांगितले असता, सोने न देता व दिलेल्या ११ लाख रुपये अब्दुल खानने परत दिले नाहीत. अब्दुल खान यांच्या उलवे येथील घरी गेले असता तो घरी नव्हता. त्याने पाठवलेल्या पावतीवरून चौकशी केली असता कोणतेच सोने ज्वेलर्सकडे बनवले नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यानुसार दासाना यांनी दिलेल्या तक्रारीवरून अब्दुल मजीद खान याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

Hon'ble Mujawar Sir Court
Advocate Swati Sinha
High Court Mumbai

### PUBLIC NOTICE

IN THE HON'BLE COURT OF CIVIL JUDGE AT PANVEL TESTAMENTARY AND INTESTATE JURISDICTION
SUCCESSION CERTIFICATE APPLICATION NO. 871 OF 2022
Exh : 8/D
N.D.23/12/2022

1) Prashant Vasant Parte
Pink City Room No.707
Building No.03
Ambernath (East)-421501 Applicant

That the above named applicant's father and deceased Late Shri Vasant Hashaba Parte died on 17 Aug 2004. Applicant is only son of the deceased and residing on the above address mentioned in the cause title.

**Description of the immovable property :- With reference to the property mentioned below :-**

**FLAT 301-ANCHIT HOMES CHS, PLOT NO.77, SECTOR NO.22, KAMOTHE, TAL-PANVEL, DIST-RAIGARH JOINTLY BELONGING TO THE LATE SHRI VASANT HASHABA PARTE DECEASED AND APPLICANT PRASHANT VASANT PARTE.**

That the Applicant has truly set forth the ownership of referred immovable property which the certificate is applied for. The succession Certificate is required for the purpose of transferring the property from joint ownership to applicant's name. At present the property is of joint ownership of the deceased and his only son i.e. applicant.

Notice is hereby given that Late Shri Vasant Hashaba Parte expired on 17 th Aug. 2004. On behalf of my client Mr.Prashant Parte, only son of the deceased, the undersigned advocate hereby invites claims or objection from any other heir/s or objector/s for the transfer of the immovable property in the name of claimant within period of 30 days from the publication of this notice, with copies of proofs to support the claim / objection. If no claims / objections are received with in the period prescribed above, my client shall be at liberty to deal with the transfer of ownership prescribed by law.

On 07 Nov 2022 at Panvel, Dist Raigarh

Court Seal
Sd/-
Asst.Suprident.
Civil Court Panvel

Hon'ble Godase Madam
Adv. Aditya D. Bhagat
Advocate for Applicant

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE, SR DIV. AT PANVEL
Civil M. A. No.1583/2022
Exh : 7/D
N.D.21/12/2022

1) Smt. Geeta Girish Jore
Age : 49 yrs. Occ. Homemaker
2) Ms. Surabhi Girish Jore
Age : 27 yrs. Occ. Service
No.1 & 2 Residing at : Room No.14,
Shri Swami Samarth CHS,
Plot No.23, Near Petrol pump,
Sector-13, Khanda Colony,
New Panvel, Raigad-410206 Applicants

All the public is informed by this notice that WHEREAS that LATE GIRISH SHIVAJI JORE expired on 19/03/2022 at the residential address at Panvel, Raigad-410206, leaving behind the Applicants as their legal heirs and representatives.

The Applicants state that deceased LATE GIRISH SHIVAJI JORE is the husband of applicant no.1 & father of applicant No.2 That Mother of the deceased i.e. LATE. CHAMPAVATI SHIVAJI JORE has also expired on 24/05/2016.

The Applicants have filed an application for getting the Heirship Certificate in respect to the following property. The description of the said property is as under ;

**SCHEDULE-A**

A residential flat bearing Flat No.14, third floor, Shri Swami Samarth CHS ltd. on Plot No.23, Sector-13, Khanda Colony, New Panvel (W), Tal. Panvel, Dist. Raigad, admeasuring about 522 Sq. Ft. build up area.

**SCHEDULE-B**

A residential flat bearing Flat No.502, fifth floor, A wing, Guru Ganesha building, ameasuring about 407 Sq. Ft. (37.86 Sq. Mtrs.) carpet, 550 Sq. Ft. (51.11 Sq. Mtrs) build up on Survey No.20/2 (p), Plot No.1 out of CTS no.5601, Katrang, Tal-Khalapur, Dist-Raigad.

If anyone wants to know whether the present Applicant is the legal heir and representative of present deceased then he / she should appear before thhis Hon'ble Court and submit their objection within 1 month from the date of this proclamation. And this is to inform that if there is no objection raised by any person within stipulated period then this Hon'ble Court after recording the evidence by the Applicant regarding her claim will issue the Heirship Certificate in favour of the Applicant.

Dated this 10 th day of November 2022, I gave my sign and Court Stamp.

Sd/-
Clerk
Hon.Court S.D.
Panvel

Court Seal

Sd/-
Asst.Suprident.
Hon.Court S.D.
Panvel

अर्जदाराचे वकील : ॲड.विजया रा. म्हात्रे

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालय
दि.चौ.अर्ज क्र.२०१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०१/२०२३

१) श्री.लहुराज गजानन पाटील
वय : ५० वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.मधुकर गजानन पाटील
वय : ५६ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.यशवंत गजानन पाटील
वय : ५९ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.विष्णू गजानन पाटील
वय : ६५ वर्षे, धंदा : शेती
५) श्री.गोपाल गजानन पाटील
वय : ४६ वर्षे, धंदा : शेती
६) श्रीम.मंजुला दिलीप पाटील
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
७) श्रीम.रजनी गणेश भोईर
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार क्र.१ ते ७ सर्व रा.पाणजे,
ता.उरण, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे, वरील अर्जदार नं.१ ते ७ यांची आई कै.बिरसूबाई गजानन म्हात्रे ह्या दि.०५/०७/२०२१ रोजी मौजे : पाणजे, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी मयत झाल्या आहेत. सदर मयत व्यक्तीस खालील प्रमाणे वारसदार आहेत. त्यांचे नावे असणाऱ्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | युनिट केस / अवार्ड नं. | सर्वे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फुंडे | १८ | ९९ | १/६ | ००-१५-० | २.२७ |
| २ | फुंडे | ४०/६१ | १९ | ६/६ | ००-०५-८ | ०.६१ |
| | | | १०४ | ७/क | ००-०४-४ | ०.५४ |
| | | | ११० | १३/क | ००-०३-० | ०.३१ |
| | | | १२९ | ५/अ | ००-०७-१ | ०.८५ |
| | | | १३३ | ४/अ | ००-१२-४ | १.५७ |
| | | | १६० | २/अ | ००-०६-१२ | ०.७५ |
| ३ | द्रोणागिरी | ६५/८६ | १६ | १४ | ००-०६-० | ०.८४ |
| | | | १८ | १६ | ००-०५-० | ०.७० |
| | | | १८ | २१ | ००-०५-० | ०.७० |
| | | | २१ | २२ | ००-०४-६ | ०.५५ |
| | | | २१ | २३ | ००-०४-३ | ०.४४ |

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.बिरसूबाई गजानन म्हात्रे यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०९ माहे नोव्हेंबर सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.क.स्तर, उरण

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, उरण

# संक्षिप्त...

## अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विठ्ठल मंदिराजवळ, गाढी नदीमध्ये, सुकापुर येथे पाण्यावर तरंगत असताना एका अनोळखी पुरुष इसमाचा मृतदेह खांदेश्वर पोलिसांना सापडून आला आहे.

त्याचे वय २५ ते ३० वर्ष असून त्याची उंची पाच फूट, दोन इंच, डोक्याचे केस काळे व वाढलेले आहेत. त्याचा रंग सावळा व काळपट असून उजव्या हाताच्या मनगटात काळा धागा, हातावर त्रिशूला सारखे गोंदन काढलेले आहे. या इसमाबाबत अधिक माहिती असल्यास सहाय्यक पोलीस निरीक्षक शांतिभूषण कामत यांच्याशी संपर्क साधावा.

## पर्समधून साडेनऊ तोळे सोन्याचे दागिने झाले चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पर्समधून साडेनऊ तोळे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सेक्टर चार, कळंबोली येथील बंडोपंत सूर्यवंशी यांनी कोल्हापूरला जात असल्याने घरातील सोन्याचे साडेनऊ तोळे वजनाचे दागिने इर्टिगा गाडीतून नेले होते. ते कोल्हापूरला काही दिवस राहिले व त्यांची दोन मुले या कारने कळंबोलीला गेली. त्यानंतर बंडोपंत व त्यांची पत्नी दोघे सोबतचे साडेनऊ तोळे सोन्याचे दागिने घेऊन स्वामी ट्रॅव्हल्स गाडीने कोल्हापूरमधून कळंबोलीच्या घरी जाण्यासाठी निघाले. व ते पहाटे कामोठे ब्रिजला उतरले. त्यानंतर काही वेळ घरी आराम केल्यानंतर त्यांनी पर्स तपासली असता त्यातून दागिने गायब झाले होते. त्यानंतर त्यांनी या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात कामोठे पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.


**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


### राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये वादपूर्व व दाखल अशी एकूण ३५ हजार २६५ प्रकरणे निकाली

# १८ कोटी ९० लाख ८४ हजार ८३८ रूपयाची तडजोड रक्कम वसूल

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

न्यायालयात वर्षानुवर्षे वाद करीत बसून वेळ, पैसा आणि ताकद खर्च करण्यापेक्षा दोन्ही पक्षांनी सामजस्याची भूमिका घेउन लोक न्यायालयात समेट घडवावा, असा प्रवाह भारतीय न्यायालयांच्या इतिहासात गेल्या दशकात प्रकर्षाने रूढ झालेला आहे. दि. १२ नोवेंबर २०२२ रोजी रायगड जिल्ह्यात झालेल्या लोकन्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वादपूर्व व दाखल अशी एकूण ३५ हजार २६५ प्रकरणे सामंजस्याने मिटवण्यात यश आले आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश श्री अमोल अ. शिंदे यांनी दिली.



राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच न्यायालयांत दाखल होण्यापूर्वीची प्रकरणे ठेवण्यात आली होती. रायगड जिल्ह्याच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती एस.एस.सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील दाखलपूर्व व प्रलंबित अशी एकूण १ लाख ०५ हजार १८६ प्रकरणे लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. त्यापैकी दाखलपूर्व ३३ हजार ७७१ व प्रलंबित प्रकरणांपैकी १ हजार ४९४ प्रकरणे अशी एकूण ३५ हजार २६५ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली निघाली व त्याव्दारे पक्षकारांना एकूण १८ कोटी ९० लाख ८४ हजार ८३८ रूपयाची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली.

१८ जोडप्यांचा लोक अदालत मध्ये संसार जुळला. रायगड जिल्ह्यातील लोकन्यायालयात १८ जोडप्यांचा (अलिबाग येथील लोकन्यायालयात ३ उरण २, पेण २, महाड ५ मुरुड १, खालापूर २, रोहा ३) सामंजस्याने वाद मिटल्यामुळे नादांयला गेली. अलिबाग येथील पक्षाकरांचा प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्रीमती एस. एस. सावंत, व पॅनलवरील न्यायधिशांनी फुल देवून सत्कार केला व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयांत ३२ लोक अदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोक अदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करूनसुध्दा प्रकरणे मिटविण्यात आली.

या लोक न्यायालयाला यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील वर्ग, जिल्हा परिषद, रायगड, पोलीस अधिक्षक रायगड व सर्व पोलीस कर्मचारी, सर्व पक्षकार यांनी भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती एस. एस. सावंत व न्यायाधीश तथा सचिव श्री. अमोल अ. शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

## रहाटाड येथील निकृष्ट दर्जाच्या अंगणवाडीचे बांधकाम ठेकेदाराने हटविले



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील मौजे रहाटाड येथे बांधण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या अंगणवाडीचे बांधकाम अखेर ठेकेदाराकडून हटविण्यात आले आहे. रहाटाड येथे ग्रामपंचायत हद्दीत जवळपास सहा महिन्यांपूर्वी अंगणवाडी चे बांधकाम करण्यात आले होते.

मात्र हे बांधकाम करीत असताना त्या ठिकाणी असलेल्या जुन्या वास्तूंच्या विटा व ईतर साहित्य नविन अंगणवाडीचे बांधकाम करताना वापरण्यात आले असल्याने सदर अंगणवाडीचे बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचा आरोप रहाटाड सरपंच चांगदेव पाटील यांनी केला होता.

तसेच अंगणवाडी बांधकामाची चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी देखील सरपंच चांगदेव पाटील यांनी संबंधित विभागाकडे केली होती. अखेर संबंधित ठेकेदाराने अंगणवाडीचे झालेले निकृष्ट दर्जाचे बांधकाम तोडले असून चांगल्या दर्जाचे मटेरियल वापरून बांधकाम पूर्ण करण्याचे आश्वासन रहाटाड सरपंचांना दिले आहे. यामुळे सरपंच चांगदेव पाटील यांच्या पाठपुराव्याला यश आले असून ठेकेदाराने घेतलेल्या भूमिकेमुळे त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

## सर्प दंश झालेल्या रुग्णाचे पनवेल उपजिल्हा रुग्णालयाने वाचवले प्राण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील नारपोली गावातील नामदेव पदु मढवी याना सर्पदंश झाल्या नंतर, मढवी यांचा जीव पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर ने वाचवला आहे. मढवी यांच्या साठी हा चमत्कारच होता कारण मढवी याना सर्पदंश झाल्याचे समजल्या नंतर मढवी यांनी, डॉक्टरकडे न जाता एका मांत्रिकाकडे उपचार घेऊन घरी बसले होते. तब्येत बिघडल्यानंतर मढवी यांनी उपजिल्हा रुग्णालयात धाव घेतला आणि त्याचा जीव वाचला आहे. मढवी यांनी डॉक्टरांचे आभार व्यक्त केले आहे

पनवेल तालुक्यातील नारपोली गावातील रहिवाशी नामदेव पदु मढवी यांना सर्पदंश झाला होता, नामदेव मढवी नेहमी प्रमाणे त्याच्या शेतात काम करत होते, काम करत असताना शतातील गवताचा भारा उचलण्यासाठी ते गेले असता या गवताच्या भाऱ्या खाली लपून बसलेल्या सापाने, त्यांच्या हाताला दंश केला, साप चावल्या नंतर ते घरी गेले आणि घरातील कुटूंबाच्या सल्लृया नंतर मढवी हे त्याच्या गावाच्या परिसरात असलेल्या एका नावाजलेल्या मंत्रीकाडे गेले, हा मांत्रिक साप चावल्या नंतर, विष उतरवतो अशी माहिती मढवी कुटूंबना काही मित्र परिवाराने दिली होती, या माहिती नुसार मढवी कुटुंब या मांत्रिका कडे उपचार करण्यासाठी गेले, मांत्रिका कडे गेल्या नंतर, मांत्रिकाने उपचार करून मढवी याना घरी जाण्याचा सल्ला देत, दवाखान्यात जाऊ नका, आराम होऊन तब्येत लगेच बरी होईल असा सल्ला दिला, उपचार घेऊन घरी गेल्या नंतर एका तासांत मढवी यांचा हात सुजू लागला तसेच रक्तस्त्राव वाढला, वाढलेला रक्तस्त्राव पहिल्या नंतर, मढवी कुटुंबानी काही तासा नंतर त्यांना उपचारासाठी पनवेल मधील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी घेऊन गेले, उपचारासाठी गेल्या नंतर सर्पदंश झाल्याची माहिती त्यांनी डॉक्टरांना दिली, डॉक्टरांनी एवढा वेळ उपचारासाठी का लावला असे विचारल्या नंतर त्यांनी डॉक्टरांना मंत्रिकाची स्टोरी सांगितली. हे ऐकल्या नंतर डॉक्टरांनी त्याच्यावर योग्य उपचार सुरू केला आणि उपचार सुरु केल्या नंतर अवघ्या काही मिनिटांत त्याची तब्येत सुधारण्यास सुरवात झाली, आणि काही तासात मढवी ठणठणीत झाले. मढवी यांची तब्येत ठणठणीत झाल्या नंतर त्यांच्या कुटूंबियांनी डॉक्टरांच्या टीम चे आभार मानले आहेत

# मा.आ.मनोहरशेठ भोईर यांचा करिश्मा ; शिवसेनेत मोठे इनकमिंग

### उरण शहरातील शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगरपालिकेची निवडणूक जशी जशी जवळ येत आहे, तसे तसे उरण शहरात राजकीय घडामोडी घडायला लागल्या आहेत. शिवसेना जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या नेतृत्वाखाली उरण शहरातील मुस्लिम मोहला व कासमभाट विभागातील शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेना (श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात पक्ष प्रवेश केला. यामध्ये मोहम्मद वकील अंसारी, हमीदा खातून, हसीना खातून, गुलषण जहान, नुर सबा, अब्दुल कलाम शाह, अब्दुल रहमान शाह, मोहम्मद सुलेमान शाह, शाहीद अंसारी, हाजरा अंसारी, मेहराब अंसारी, रझीया ईमरान शेक, अजमेरी खातून, शबनम खातून, ईरफान अंसारी, मकसूद अंसारी, फरयाझ, अंसारी, सरफराझ अंसारी, सबीहा खा–तून, अल्लाउद्दीन अंसारी व कार्यकर्ते यांचा समावेश आहे. या वेळी जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहरशेठ भोईर व शिवसेना गटनेते गणेश शिंदे यांनी भगवी शाल अर्पण करून सर्वांचे शिवसेना(श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात स्वागत केले.



दिवसेंदिवस उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात पक्ष प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढतच आहे. त्यामुळे उरण मध्ये शिव–सेना भक्कम होत आहे.

या कार्यक्रमास गटनेते गणेश शिंदे, नगरसेवक अतुल ठाकूर, नगरसेवक समीर मुकरी, युवासेना शहरप्रमुख नयन भोईर, अल्पसंख्याक सेलचे विधानसभा अध्यक्ष एजाज मुकादम, महिला तालुका अध्यक्ष हुसेना शेख, शाखाप्रमुख समीम शेख, उपशाखाप्रमुख शाहरुख गडी, रामचंद्र मोकळ, महमंद शेख व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्ह्यातील आगामी निवडणुका बाळासाहेबांची शिवसेना -भाजपा एकत्रित लढविणार : आ.भरतशेठ गोगावले

**दै.रायगड नगरी । महाड**

जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका आणि ग्रामपंचायत निवडणुका युतीच्या माध्यमातून एकत्र लढविण्याचा निर्णय बाळासाहेबांची शिव–सेना आणि भारतीय जनता पक्षाने घेतला आहे. त्यादृष्टीने संयुक्त बैठकांना सुरुवातही झाली आहे. काल (रविवारी) महाड येथे या दोन्ही पक्षांची संयुक्त बैठक घेण्यात आली. जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर युतीचा झेंडा फडकविण्याचा निर्धार यावेळेस बोलताना आ. भरतशेठ गोगावले यांनी व्यक्त केला.



शासकीय विश्रामगृहात झालेल्या या संयुक्त बैठकीला आ. भरतशेठ गो–गावले, भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामुणकर, बाळासाहेबांच्या शिवेसनेचे तालुकाप्रमुख सुरेश महाडीक, भाजपचे तालुकाध्यक्ष जयवंत दळवी, बाळासाहेबांच्या शिवसेनेचे शहरप्रमुख नितीन पावले, भाजपचे ज्येष्ठ नेते शेखर ताडफळे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळेस बोलताना, भाजपचे तालुकाध्यक्ष जयवंत दळवी यांनी अडीच वर्षाच्या काळात भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून सुचविण्यात आलेली कामे प्रलंबित असल्याची तक्रार करीत, ही कामे मार्गी लागावित यासाठी आपल्या आमदार निधीतून निधी उपलब्ध करुन देण्याचे आवाहन आ. गोगावलेंना केले.

जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामुणकर यांनी दोन्ही पक्षांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकोप्याने या निवडणुकांना सामोरे जाण्याचे आवाहन यावेळेस केले. निवडणुकांची रणनिती निश्चित करण्यासाठी दोन्ही पक्षांच्या प्रत्येकी पाच सदस्यांची एक समिती महाड शहरात स्थापन करण्यात येईल, अशी माहिती शहरप्रमुख नितीन पावले यांनी दिली.

आ. भरतशेठ गोगावले यांनी, अडीच वर्षे राज्यात असलेली सत्ता शिवसेनेच्या अनेक आमदारांना पसंत नसल्यानेच साडेतीन महिन्यांपूर्वी उठाव करावा लागल्याचे आपल्या भाषणात सांगितले. पुन्हा भारतीय जनता पक्षाबरोबर सत्तेमध्ये सहभागी होऊन, स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदूत्वाचे विचार पुढे नेण्याचा संकल्प आम्ही सोडला असल्याचेही ते म्हणाले.






# जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते रायगड जिल्हा ग्रंथोत्सव 2022 चे उद्घाटन उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१४ व दि.१५ नोव्हेंबर २०२२ रोजी सार्वजनिक ग्रंथालय व जिल्हा ग्रंथालय, डोंगरे हॉल, अलिबाग येथे रायगड जिल्हा ग्रंथोत्सव २०२२चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी तथा रायगड ग्रंथोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.




यावेळी जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर म्हणाले की, ग्रंथोत्सवात विविध विषयांवरील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सध्या डिजिटल युग चालू आहे. मात्र या डिजिटल युगात तुम्ही जोपर्यंत पुस्तक हातात घेणार नाहीत आणि त्या पानांचा आवाज किंवा पानांचा सुवास पुस्तक वाचताना दर–वळणार नाही तोपर्यंत माझ्या मते डिजिटल पुस्तकांची ओळख पुढच्या पिढीला होणार नाही. आजही दिवाळी आली की आपण दिवाळी अंक खरेदी करतो, ते आवडीने वाचतो. तरुण पिढीमध्ये या डिजिटल चळवळीमध्ये, इंटरनेटच्या युगामध्ये पुस्तकाचा सुवास नक्कीच दरवळला पाहिजे. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्येही ग्रंथोत्सवाचे आयोजन केल्यास त्याचा निश्चितच फायदा होईल. जी पुस्तके जीर्ण झाली आहेत अशा पुस्तकांच्या डिजिटायझेशनसाठी देखील सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील. गरुडझेप स्पर्धा परीक्षा केंद्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींना प्रशिक्षण देण्यात येत आहे. पेण आणि अलिबाग तालुक्यात गरुडझेप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या इमारतीचे बांधकाम सुरू असून लवकरच ते स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्यांकरिता खुले होईल. या अभ्यासिकेचा येथील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींना निश्चितच होईल. यावेळी ज्येष्ठ साहित्यिका श्रीमती इंदुमती जोंधळे म्हणाल्या की, पुस्तके आपल्याला घडवत असतात, विचार देत असतात. पुस्तके माणूस म्हणून आपल्याला श्रीमंत करत असतात.त्यामुळे ज्या घरात पुस्तकाचे कपाट ते घर श्रीमंत आहे. माणूस म्हणून दुसऱ्याच्या मनाचा विचार आपल्याला करता आला पाहीजे. यावेळी माजी नगराध्यक्ष अलिबाग प्रशांत नाईक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ज्योत्स्ना शिंदे, कोकण मराठी साहित्य परिषद, रायगड जिल्हा अध्यक्ष सुधीर शेठ, रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बोंदार्डे, कोकण मराठी साहित्य परिषदेच्या रायगड जिल्हा अध्यक्षा सुचिता पाटील, प्रभारी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार आदी मान्यवर उपस्थित होते.